0 7 MAR 2022

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात पदवी प्राप्त विद्यार्थिनींची संख्या विद्यार्थ्यांपेक्षा अधिक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** दहावी-बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये मुलांपेक्षा मुलींचे प्रमाण अधिक असल्याचे अलीकडच्या निकालांवरून दिसत आहे. पदवी प्राप्त विद्यार्थिनींची संख्या सुद्धा वाढत आहे. शिवाजी विद्यापीठात हे प्रमाण ५२ टक्क्यांहून अधिक असल्याचे नुकत्याच झालेल्या पदवीदान समारंभाची आकडेवारी सांगते. मुलांना मागे टाकून मुली पदवीप्राप्त करण्यात झेप घेत आहेत.

शिवाजी विद्यापीठाची स्थापना १९६२ साली झाली. कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी या जिल्ह्यांचा विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये समावेश होता, नंतर रत्नागिरी हे मुंबई विद्यापीठाला जोडण्यात आले. तर २००४ साली सोलापुरात स्वतंत्र विद्यापीठ झाल्याने हा जिल्हा बाजूला गेला. सध्या कोल्हापूर, सांगली व सातारा अशी तीन जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र आहे. तरीही पूर्वीच्या तुलनेने पदवीप्राप्त विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय प्रमाणात वाढत आहे. मात्र या वाढत्या निकालातील वेगळेपण म्हणजे पदवी प्राप्त करणाऱ्या मुलांपेक्षा मुलींची टक्केवारी अधिक आहे.

## ३० वर्षांनंतर एक चतुर्थांश

१९६४ साली १०९४ विद्यार्थी पदवी घेणारे होते. त्यामध्ये मुलींचे प्रमाण केवळ १८ टक्के म्हणजे १९९ इतके होते. १० वर्षांनंतर मुली पदवी प्राप्त करण्याची टक्केवारी किंचित घटली. ती १६.६५ इतकी राहिली. १० हजार ५१ विद्यार्थ्यांपैकी १६६३ विद्यार्थिनींनी पदवी प्राप्त केली. त्यानंतर दहा वर्षांनी (तीन दशकांच्या प्रवासानंतर) पदवीप्राप्त विद्यार्थिनींची संख्या एक चतुर्थांश इतकी झाली. १९८४ साली १२,६२८ पैकी ३२८६ (२५.८० टक्के) विद्यार्थिनींनी पदवी प्राप्त केली. तर १९९४ साली २४ हजार ९३५ पैकी ७८१७ विद्यार्थिनी (३१.३५) टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाल्या.

## विद्यार्थिनींचे धवल यश

२०१८ सालापासून विद्यार्थिनींचे पदवी मिळवण्याचे प्रमाण झपाट्याने वाढले. या वर्षी प्रथमच ५० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी पदवी घेतली. ५० हजार ४४४ पैकी २६ हजार ९३८ (५३.४५ टक्के) इतके प्रमाण विद्यार्थिनींचे होते. तर नुकत्याच झालेल्या यंदाच्या २०२२ सालच्या पदवीदान समारंभात ६२ हजार ३६० पदवीप्राप्त विद्यार्थ्यांत ३२ हजार ५२० विद्यार्थिनी (५३.४० टक्के) होत्या. हे प्रमाण २०१८ च्या तुलनेत किंचित कमी (५२.१५ टक्के) झाले आहे. तरीही विद्यार्थ्यांपेक्षा विद्यार्थिनी पदवी प्राप्त करण्यात आघाडीवर असल्याचे आकडेवारी दर्शवत आहे.

पुढारी

# विद्यापीठात आज महिला मेळावा, उद्योग प्रदर्शनाचे उद्‌घाटन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, फेस्कॉम प्रादेशिक विभाग सांगली व कोल्हापूर, सावित्रीबाई फुले ज्येष्ठ नागरिक सेवा संघातर्फे सोमवारी (दि. ७) सकाळी १० ते ४ या वेळेत महिला मेळावा, उद्योजिकांसाठी उद्योग प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. जागतिक महिला दिनानिमित्त मानव्यशास्त्र सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील महिला सहभागी होणार आहेत, अशी माहिती प्रभारी संचालक डॉ. ए. एम. गुरव यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठातील वसतिगृहे आजपासून सुरू होणार

## चीफ रेक्टर डॉ. एस. पी. हंगिरगेकर यांची माहिती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील वसतिगृहे सोमवारपासून सुरू होणार आहेत. याबाबतची तयारी पूर्ण झाली असून सर्व अधिविभाग प्रमुखांना कळविले जाणार असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठातील वसतिगृहांचे चीफ रेक्टर डॉ. एस. पी. हंगिरगेकर यांनी दिली.

विद्यापीठ कार्यक्षेत्रात २७६ महाविद्यालये आणि २ लाख ५० हजार विद्यार्थी आहेत. विद्यापीठात ४१ अधिविभाग आहेत. सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील अनुदानित १३३ महाविद्यालयांत ९१ वसतिगृहे आहेत. शिवाजी विद्यापीठात मुले (३), मुली (२), कमवा व शिका योजना (२), तंत्रज्ञान अधिविभाग (२), पीएच.डी. संशोधक (१) अशी मिळून दहा वसतिगृहे आहेत. वसतिगृहे बंद असल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. २ मार्चपासून द्वितीय शैक्षणिक सत्र सुरू झाले आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने वसतिगृहे सुरू करण्याची तयारी पूर्ण केली आहे. याबाबत सोमवारी सर्व अधिविभागांना माहिती दिली जाणार आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश दिला जाणार असल्याचे डॉ. हंगिरगेकर यांनी सांगितले.

तरूण भारत

# विद्यापीठातील वसतिगृह आजपासून सुरू होणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

- परगावच्या विद्यार्थ्यांना दिलासा
- विद्यापीठाकडून वसतिगृहाची स्वच्छता, सॅनिटायझेशन सर्व सुविधा परिपूर्ण

शिवाजी विद्यापीठातील दहा वसतगिृह आजपासून सुरू होणार आहेत. कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार वसतिगृह सुरू करण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा, यासंदर्भातील पत्र अधिविभागप्रमुखांना वसतिगृह अधीक्षक पाठवणार आहेत, अशी माहिती वसतिगृह अधीक्षक डॉ. एस. पी. हंगिरगेकर यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठातील दहा वसतिगृह तब्बल दोन वर्षांनी सुरू होणार आहेत. त्यामुळे अधिविभागात शिक्षण घेणाऱ्या परगावच्या जवळपास ३ हजारहून अधिक विद्यार्थ्यांना न्याय मिळणार आहे. वसतिगृहात राहून प्रत्यक्ष अध्ययन आणि प्रॅक्टीकल करण्याचा आनंद विद्यार्थ्यांना घेता येणार आहे. तसेच पीएच. डी. शोधप्रबंध व संशोधन प्रकल्प पूर्ण करणे सोयीचे जाणार आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या या निर्णयाचे अभिनंदन विद्यार्थी व पालकांकडून होत आहे. जिल्हा प्रशासनाकडून वसतिगृह ताब्यात आल्यानंतर विद्यापीठ प्रशासनाने वसतिगृहांची स्वच्छता, सॅनिटायझेशन, बेडची देखभाल दुरूस्ती अशी सर्व तयारी केली आहे. त्याचबरोबर विद्यापीठातील सर्व वसतिगृहांचे खानावळ चालकाबरोबर करार झाले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या राहण्याचा व जेवणाचा प्रश्न मिटणार आहे.

## कमवा शिका अंतर्गत २०० जणांना प्रवेश

डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनमध्ये 'कमवा व शिका योजने' अंतर्गत गरीब, होतकरू आणि हुशार विद्यार्थ्यांची राहण्याची व जेवणाची सोय केली आहे. त्याबदल्यात विद्यार्थ्यांना दररोज तीन तास काम करावयाचे आहे. सध्या ३०० पेक्षा जास्त मुला-मुलींचे अर्ज आले आहेत. मुलाखती घेऊन त्यापैकी २०० मुला-मुलींना भवनमध्ये प्रवेश दिला जाणार आहे.

**डॉ. निलेश तरवाळ**

**(मुख्य अधीक्षक, डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन, शिवाजी विद्यापीठ)**

तरूण भारत

# विज्ञानाच्या जोरावरच देशाची प्रगती

## अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर :** बदलत्या काळानुसार तंत्रज्ञानात झपाट्याने प्रगती झाल्याने, येणारा काळ 'इंटरनेट ऑफ थिंग्स'चा असेल, यासाठी विद्यार्थ्यांनीही सृजनशीलतेला वाव द्यावा, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेचे आधिष्ठाता डॉ. आर. के. कामत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात उपस्थित विद्यार्थ्यांना विज्ञान सप्ताहात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. जगन कराडे व एसएआयएफ - डीएसटी केंद्राचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. कामत म्हणाले, नव्या युगातील तंत्रज्ञानाला अतिशय महत्व आहे. त्यांनी स्मार्ट टूथ ब्रश ज्याद्वारे आपण दात व्यवस्थित घासतो की नाही हे पाहिले जाते. स्मार्ट कपडे ज्याद्वारे शरीराचे तापमान, रक्तदाब, हृदयाचे ठोके यांची माहिती मिळवता येऊ शकते. यांसारख्या अचंबित करणाऱ्या उपकरणांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. पुढे त्यांनी ड्रोन तंत्रज्ञानाबद्दल माहिती सांगत विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके दाखवली. यावेळी जत येथील राजे रामराव महाविद्यालय, विटा येथील मॉडर्न कॉलेजचे विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. आर. के. कामत यांचा सत्कार डॉ. जगन कराडे यांच्या हस्ते केला. अश्विनी पाटील यांनी सुत्रसंचालन केले. प्रा. के. डी. पवार यांनी आभार मानले.